# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३
E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in
Website: www.jdroamt.org
Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०१९/262
दिनांक :- 24 JAN 2019

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या
पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- MahaDBT पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेले अर्जा संबंधित करावयाच्या कार्यवाही बाबत.**

**संदर्भ :-** मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या दिनांक २४/१/२०१९ रोजीच्या सुचना.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मुंबई यांच्या दि.२४/०१/२०१९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये व्ही.डी.ओ. कॉन्फरन्सव्दारे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता विविध योजनेकरीता शासनाचे **MahaDBT पोर्टलवर** विद्यार्थ्यांचे अर्जाबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत त्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

१) संस्थेतील एस.सी./एस.टी/व्हीजेएनटी/ओबीसी व अन्य प्रवर्गातील प्रवेशित ज्या पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत अश्या विद्यार्थ्यांचे अर्ज तपासून आपल्या स्तरावरुन Approved करुन **त्वरीत** सबंधित विभागाकडे (सामाजिक न्याय विभाग, व आदिवासी विकास विभाग आणि तंत्रशिक्षण विभाग) यांचेकडे मंजुरीकरीता सादर करावे जेणेकरुन सबंधित विद्यार्थ्यांना तात्काळ लाभ मिळणे शक्य होईल.

२) MahaDBT कडुन परिपुर्ण अर्ज असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे प्रदान झालेले आहे परंतु विद्यार्थ्यांनी Redeem Button चा उपयोग केलेला नसल्यामुळे सदर रकमेचा लाभ विद्यार्थ्यांचे व संस्थेच्या खात्यामध्ये आलेला नाही त्यामुळे Redeem Button च्या वापराबद्दल संस्थेने विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन मार्गदर्शन करावे.

३) काही विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार संलग्नित (Aadhar Seeding) नसल्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम त्यांच्या व संस्थेच्या खात्यामध्ये वर्ग होत नसल्याचे निदर्शनास आले आहे तरी विद्यार्थ्यांना याबाबत आपल्या स्तरावरुन मार्गदर्शन करावे.

तसेच आपणास कळविण्यात येते की, वरील सुचनांबाबत आपल्या स्तरावरुन त्वरीत कार्यवाही करावी.

**(डा. डी.व्ही. जाधव)**
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

E:\backup old\backup kadam\all manish letter ghts 30.doc

996